सुधारित आदिवासी उपयोजना (क्षेत्रांतर्गत/क्षेत्राबाहेरील) राबविण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन पुरक पत्र क्रमांक: आयुओ-२४१७/प्र.क्र.१२७/३-अे
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.

दिनांक- ३० डिसेंबर, २०१७

वाचा:- १) शासन निर्णय क्र: आयुओ-२४१६/प्र.क्र. १७७/४-अे, दिनांक ९ ऑगस्ट, २०१७

२) कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेले जा.क्र. विप्र-७/आयुओ/२०१७-१८/५०७/२०१७, दिनांक १९ ऑगस्ट, २०१७ चे पत्र

शासन पुरक पत्र :-

उपरोक्त वाचा येथील क्रमांक १ येथे नमूद केलेल्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १०,१५,२०(ii), २०(vii)(आ), २१.२ व २१.६ यामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

परिच्छेद क्रमांक १०:- राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्लॅस्टिक फील्म ५०० मायक्रॉनची असावी अशी तरतूद असल्याने आदिवासी उपयोजनेंतर्गत प्लॅस्टिक स्पेसिफिकेशन ५०० मायक्रॉन असावी.

परिच्छेद क्रमांक १५:- या योजनेंतर्गत सूक्ष्म सिंचनासाठी देण्यात येणारे अनुदान प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानास पूरक अनुदान देऊन आदिवासी शेतकऱ्यांना एकूण खर्चाच्या ९० % पर्यंत तथापि, रु. ५०,०००/- च्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल.

परिच्छेद क्रमांक २०(ii):- शेतकऱ्याकडे अनुसुचित जमातीचे जात प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

परिच्छेद क्रमांक २०(vii) (आ):- दारिद्र रेषेखालील शेतकऱ्यांना विहीर घटकाचा लाभ घेण्यासाठी किमान ०.४० हे. शेती असणे आावश्यक राहील. तसेच आदिवासी लाभार्थ्यांच्या जमीन दुर्गम भागात व विखंडीत असल्याने ०.४० हे. पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान ०.४० हे. इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. त्याचप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ६.० हे. धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही.

परिच्छेद क्रमांक २१.२:- सन २०१७-१८ या वर्षासाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यापासून सूट देण्यात आली आहे.

परिच्छेद क्रमांक २१.६:- अर्जदार शेतकऱ्याकडे कोणत्याही प्रकारची शासकीय देणे उदा. शासकीय किंवा बँक कर्जाची परतफेड, वीजेचे बील, पाणीपट्टी अथवा कोणत्याही प्रकारची थकबाकी असली तरी त्यांना योजनेचा लाभ देण्याची अनुमती देण्यात येईल. शेतकऱ्यांकडे असलेली थकबाकी वसूल करण्यासाठी संबंधीत यंत्रणांनी प्रयत्न करावेत.

तसेच आदिवासी शेतकऱ्यांना विज पंप/तेल पंप व एचडीपीई पाईप पुरवठा ही महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेली योजना यापुढे विभागाच्या उपरोक्त वाचा येथील संदर्भ क्रमांक १ अन्वये निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये लागू केलेल्या सुधारित योजनेमार्फत राबविण्यात

यावी. तसेच आदिवासी शेतकऱ्यांना विज पंप/तेल पंप व एचडीपीई पाईप पुरवठा करण्यासाठी पात्रता तपासताना (१) वैयक्तिक वनहक्क पट्टेदार, (२) आदिम जमाती, (३) दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी व तद्नंतर इतर लाभधारक आदिवासी शेतकरी याप्रमाणे प्राधान्य देण्यात यावे.

सदरची योजना ही **'बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना'** या नावाने ओळखली जाईल.

उपरोक्त वाचा येथील क्रमांक १ येथे नमूद केलेल्या दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयातील इतर तदतूदी जशाच्या तशा लागू राहतील.

सदर शासन पुरक पत्र वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १७८/व्यय-४, दिनांक १२.१०.२०१७ व आदिवासी विकास विभागाने दिलेल्या अभिप्रायास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन पूरक पत्र महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१७१२१८११३५०२७९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa679a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2017.12.30 15:08:55 +05'30'

(चं. वि. घायतडक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२) मा. मंत्री (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (आदिवासी), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४) मा. राज्यमंत्री (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री (कृषी व पणन), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)
१०) आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) आयुक्त (आदिवासी विकास), नाशिक
१२) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४) सर्व विभागीय कृषि सह संचालक
१५) सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी
१६) सर्व कृषी विकास अधिकारी
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षण), महाराष्ट्र - ½ मुंबई/ नागपूर
१९) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
२०) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२१) मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, वाशी
२२) उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी, औरंगाबाद
२३) उप संचालक, लेखा व कोषागारे, ओरंगाबाद
२४) सर्व कार्यासन व पर्यवेक्षीय अधिकारी (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२५) वित्त विभाग (व्यय-१),(व्यय-४), मंत्रालय, मुंबई ३२
२६) आदिवासी विकास विभाग (कार्यासन - ९), मंत्रालय, मुंबई
२७) निवड नस्ती